श्री राजु तुकाराम विधाते,तत्कालिन ग्रामपंचायत अधिकारी ,ग्रामपंचायत उक्कडगांव तालुका श्रीगोंदा यांचे अपहार/ गैरवर्तनाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग

जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/ २९२ /२०२५

अहिल्यानगर, दिनांक - स्वाक्षरीखाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ:- १.इकडील दोषारोप- ज्ञापन क्र.ग्रापं-३/१४२७८८१/२०२५,दि.११.०७.२०२५.

२.गटविकास अधिकारी पंचायत समिती,पारनेर यांचेकडील पत्र क्र. आस्था-२/९३७/२०२५ दि.०२/०९/२०२५. (ज्ञापन पोहोच)

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

४. गटविकास अधिकारी पंचायत समिती,पारनेर यांचेकडील पत्र क्र. आस्था-२/९५७/२०२५ दि.११/०९/२०२५ नुसार श्री राजु तुकाराम विधाते यांचा खुलासा.

<u>आदेश</u>

ज्याअर्थी, श्री राजु तुकाराम विधाते, तत्कालिन ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत उक्कडगाव तालुका श्रीगोंदा येथे कार्यरत असताना अपहार/गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.१ अन्वये एकुण ०१ दोषारोप ठेवणेत आले होते. श्री.विधाते, यांनी संदर्भ क्र.४ नुसार दोषारोपांचा खुलासा सादर केलेला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप क्र.०१ अमान्य केलेले आहेत. सबब, श्री.विधाते, यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार चौकशी करणे आवश्यक असलेने संदर्भ क्र.३ चे आदेशात नमुद केलेनुसार चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

त्याअर्थी मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्री राजु तुकाराम विधाते, तत्कालिन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत उक्कडगांव तालुका श्रीगोंदा यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेवतीने श्री.संजय अर्जुन वाघ, विस्तार अधिकारी, (पंचायत) पंचायत समिती श्रीगोंदा नियुक्ती करीत आहे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्री.राजु तुकाराम विधाते यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्वकामकाज नियमाप्रमाणे करावे व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

विभागीय चौकशी प्रकरणी चे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०९२९०६०९३९ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-09-2025 20:58:04
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

सहा.आयुक्त, (चौकशी),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.

२/- सोबत श्री राजु तुकाराम विधाते, तत्कालिन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत उक्कडगांव तालुका श्रीगोंदा यांचे गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचिका या समवेत जोडली आहे. तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

प्रति,

श्री.संजय अर्जुन वाघ,विस्तार अधिकारी,(पंचायत) पंचायत समिती श्रीगोंदा.
व्दारा:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा.

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर.

२/- सोबतचा आदेश श्री.राजु तुकाराम विधाते,ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- निवड नस्ती.

(स्वाक्षरीत/-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर